म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७०८



लेखक.

**विश्वनाथ नारायण वाड.**

नाशिक.

REFBK-0003567

किंमत १ आणा.

## सन्मान्य साहित्य-सेवकांस!

पुरी ग्वालेरी पुण्य राजधानीं
कीर्ति शिंद्यांची लोक जिथें वानी
बाल तेजस्वी भूपती जिवाजी
पुढें होवो विख्यात जगीं गाजी ॥ १ ॥

मराठीचा अभिमान मनीं राहे
म्हणुनि सम्मेलनि सुजन येत आहे
तिथें येणें मज शक्य जरी नोहें
यथाशक्ती वाचण्या धाडिताहे ॥ २ ॥

मान्य होवो ही आज अल्पसेवा
अशी वांछा मम पूर्ण करा देवा !
सुखद लोकां वार्धिष्णु चंद्र जैसा
**मराठीचा** उत्कर्ष होवुं तैसा ॥ ३ ॥

यथाशक्ति घडो सेवा इच्छा ही प्रबला वसे !
निबंधा धाडिलें आज स्वीकरा थोरमानसें ॥

REFBK-0003567

हुंडा.

१९२८ मराठी साहित्य सम्मेलन
ग्वाल्हेर
येथें वाचण्यास पाठविलेला निबंध.

कन्यादान समयीं वरास दक्षिणा देण्याची चाल पूर्वकालीं असे, तिलाच हल्लीं हुण्डा असे म्हणतात. सांप्रतकालीं हा हुण्डा म्हणजे सामान्य देणगीच्या स्वरूपाचा राहिला नसून यानें विवाहाचा व्यवहार फार त्रासदायक करून ठेविला असल्यानें, प्रस्तुत निबन्धांत, त्याचा स्थूलतः विचार करण्याचें ठरविलें आहे.

अलीकडे या हुण्ड्याला येवढें असामान्य महत्व प्राप्त झालेलें दिसतें कीं, त्यामुळें सुन्दर, सुस्वरूप व सद्गुणी अशा मुलींना केवळ गरीबीमुळें श्रीमंत घराण्याशी सम्बन्ध जोडनं कठीण होऊन बसते. वास्तविक विचार केला तर विवाह ह्मणजे बाहुला-बाहुलीचें मुलांचें लटुपटींचं खेळणें नव्हें. दोन भिन्न कुटुम्बांचें कायमचें नातें जोडलें जाऊन, धर्मार्थ-काम-मोक्षादि चतुर्विध पुरुषार्थ साधनासाठीं जमविलेली प्रेमग्र म्हणजे विवाह होय ! पण निरंतर टिकणाऱ्या सम्बन्धामध्यें केवळ एकवेळ मिळणाऱ्या

७३१५१

लाभासाठीं विक्षेप आणण्यास सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांनीं तयार व्हावें हें पाहून आम्हांस सखेदाश्चर्य वाटतें. पूर्वकालीं बालविवाहाची चाल आमच्या लोकांत सर्रास सुरू असल्यानें, कांहीं विशिष्ट धर्मसंस्कारा-पलीकडे लग्नव्यवहारांत वधु-वरांचें आंग नसे, परंतु हल्लीं प्रौढ विवाह होत असूनही ही बेसुमार हुंडा मागण्याची घातक चाल का प्रचारांत असावी या गोष्टीचें राहून राहून नवल वाटतें! ह्या परिस्थितीचीं कारणें जरी भिन्न भिन्न असली तरी उच्च शिक्षण संस्कारामुळें मनाचें औदार्य, अंतःकरणाची ऋजुता व विचारांचा प्रौढपणा या सद्गुणांची वाढ होण्याऐवजीं क्षुद्रता, संकुचितता, व हांवरेपणा, या दुर्गुणानां बळी पडण्याची प्रवृत्ति, सुशिक्षितांत अधिकाधिक का दिसून यावी बरें? वधूपरिक्षा करितांनां तिच्या सद्गुणाकडे दृष्टि द्यावी, तिचें कुलशील उच्च आहे कीं नाहीं, हें पहावें, तिला बंधु, भगिनी आहेत कीं नाहींत याचा शोध करावा. विचार करून पाहिलें तर, वरील सर्व गोष्टी, एकवेळ मिळणाऱ्या हुंड्यापेक्षां अनंतपटीनें श्रेष्ठ आहेत व त्यांच्या बऱ्या वाईटपणावर भावी वधू-वरांचें

कल्याण अ-कल्याण सर्वस्वीं अवलंबून आहे.

अलीकडे हुंडा म्हणजेच जणू कांहीं लग्नव्यवहार! ह्या हुंडारूपीं मोहिनीनें जन-मनांवर आपला येवढा अंमल बसविलेला दिसतो कीं, त्यामुळ चांगल्या शहाण्यासुरत्या माणसांच्या दृष्टीला मांद्य येऊन, त्यांच्या विवेचक बुद्धीला भ्रष्टता येत असते! हुंड्यामुळें काळ्या मुलीला धवलता प्राप्त होते, कुरूपाची सुरूप होऊं शकते! इतकेंच केवळ नव्हें तर एखाद्या आफ्रिकेंतील हुंडीला, साक्षात् अस्मानच्या परीची योग्यता येऊं शकते! प्रथमतः वधू परीक्षण समयीं, वधूच्या आंगीं, असंख्य दुर्गुण दिसत असतां, या हुंडारूपा परिसाच्या स्पर्शानें ते शुद्ध बावनकशी सोनें बनून जातात. हा रौप्य मुद्रिकांचा श्रवण-मधुर निनाद वधूमध्यें खोडी काढण्याकरितां टपून बसलेल्या अहंमन्य व झब्बू लब्ध प्रतिष्ठितांना श्रवण मधुर वाटूं लागतो, व त्याच्या भावी लाभाचें रम्य चित्र वधू मधील व्यंगें नजरेआड करण्याच्या मोहास त्यांना सवथा प्रवृत्त करीत असते.

हुंडा बेसुमार घेणारीं माणसें जर आपल्या स्थितिमानाचा विचार करीत जातील, तर त्यांना आधिक

पैसे मागण्याची लाज वाटल्या वाचून राहणार नाहीं. मुलगा केवळ पदवीधर आहे, पण त्याची इतर परि-स्थिती-घर ना दार, अशासारखी असूनही, लग्नप्रसंगीं कल्पनातीत **हुंडा** मागण्याची, व एखाद्या उमरावासही, न शोभेशी उर्मटपणाची वागणूक ठेवण्याची तऱ्हा पाहून आम्हाला अगदीं हंसूंच कोसळतें! अशा लोकांच्या घरीं, बिचाऱ्या वधूला हलकीं कामें कर-ण्याचा प्रसंग आलेला पाहून, तिच्या पितराना काय वाटत असेल, तें इतरांना कळणें शक्य! नाहीं यावरून आम्हीं शिक्षितांचे द्वेष्टे आहों, असें समजण्याचें कारण नाहीं. उलट हा दिखाऊ दिमाख नाहींसा व्हावा, व सहानुभूती व सदयता शिक्षणामुळें लोकांत यावी, असें आम्हास मनापासून वाटते. विश्वविद्यालयीन शिक्षणानें, उच्च विचार उद्‌भूत व्हावेत पण उलट इकडे तरुणाकडे पहावें तों काव्यमय आचार, व नटवत् प्रचार, यांचा नुसता धुमाकुळ माजलेला दिसतो. तरुणपणांत भावनाप्रधानत्वामुळें प्रत्येक वर, स्वतःला रंभा, ऊर्वशी, वधू मिळेल या रम्य दृश्यावर तुष्ट होऊन गेलेला दिसतो; परंतु पाश्चात्य विचारांचा पगडा

युवतीमनावर दृढतर होऊन गेलातर बिचाऱ्या असंख्य शेखमहंमदी तरुणांवर, शेवटीं वधू विरहित राहण्याची पाळी न येवो म्हणजे मिळविली.

कांहीं सुधारका-प्रमाण, निवळ हुंडा घेणें हेंच महत्पातक आहे असें आम्हास बिलकूल वाटत नाहीं. जुनें तें प्रत्येकच जरी सोनें नसलें, तरी प्रत्येक गोष्ट नवी म्हणूनच हवी, ही विचारसरणी तितकी हितकर ठरणार नाहीं. सौम्यस्वरूपांत जर हा हुंडा कायम राहील तर कोणालाच जाचक वाटणार नाहीं. देणें घेणें हा जगाचा व्यवहार असल्यानें, मित प्रमाणांत उभय पक्षांस सुखकर रीतीनें हुंडा घेतला गेला तर दुष्परि-णाम होण्याची भीती राहणार नाहीं. जेथें आपली मुलगी उर्वरित आयुष्याचा महत्वाचा काल व्यतीत करणार ज्या कुलाशीं ती विवाहरज्जूनें निगडीत होणार, ज्या पतीशीं तिचें अक्षयचं परमपवित्र नातें जोडलें जाणार, अशा सर्व गोष्टींनां कारणीभूत करणारा जो विवाह, त्या मंगलप्रसंगीं मुलीच्या बापानें, स्वस्थिति-मानानुरुप खर्च करण्यास मागं पुढें पाहण्याचें कारण नाहीं, कन्येला सुस्थळ मिळालेलें पाहून पितरांस संतोष

होत असतो व तज्जन्य देणगी म्हणून जर हुंडा दिला गेला तर तें हितावह होईल.

समाजशास्त्रदृष्ट्या दोन समान कुटुंबांना, विवाहा मुळें आपले संबंध घडवून आणतां येतात, पण कुलांची समानता ठरविणें तितकें सुलभ होत नाहीं. बाह्यतः उच्च्य कुटुंबीय दिसणारी माणसें, नेहमी नीतिमत्तेंत तशीं असतातच असा नियम नाहीं. तेव्हां हा प्रश्न प्रत्येकाचे विचार, व अभिरुची यांवर अखेर अवलंबून राहील.

हुंडा अनिवारपणें मागण्याच्या, स्वैराचारास निर्बंध घालणें आवश्यक होय. हा प्रश्न ज्ञातिहित संबंधांत पुढाकार घेणाऱ्या नेत्यांचा असून, गावोंगांवीं या संबधीं नेटाचे प्रयत्न केले पाहिजेत. निर्लज्यपणानें, परिस्थिती बाहेर, हुंड्याची मागणी करणारे लोकांचा, समाजांत धिःकार केला जावा, व त्यांचा हा दुर्गुण प्रमुखपणें लोकनिदर्शनास आणण्याची तजवीज व्हावी. यावर हा प्रश्न वैयक्तिक खुषीचाच राहणार, त्यास इलाज नाहीं.

एकंदरींत ही हुंड्याची धोंड लग्नव्यव

आड येऊं नये. अनुकूल वधु-वरें विवाह संबंधानें झाल्यास, समाजांत शांति व सौख्य यांची अभि होईल. दोन भिन्न कुलीन व्यक्तींना, विवाहानें निग करून त्यांस, स्नेहरज्जूनें संसार रथास जोडण महत्कार्य विवाह घडवून आणीत असतो. अशा मं समयीं, त्या हुंडारूपी दुष्ट राहूनें पतिपत्नीच्या सूर्यास ग्रासून टाकणें सर्वथा अनिष्ट होय. शेवटी सत्य संकल्पाचा दाता, लोकांना योग्य मार्ग दा व तेणेंकरून समाजाचें कल्याण होवो, अशी दयामयाजवळ, आमची प्रेमाची याचना आहे.

REFBK-0003567

# वाड यांचीं इतर पुस्तकें

—विक्रीस तयार—

१ काव्यकुसुमोद्यान.

(प्रथमांजलि) विविध विषयक सुबोध कविता किं. ६ आणे

२ गृहरोगनिवारण

होमियोबायोकेमिक कुटुंब वैद्यक फार उपयुक्त किं.

३ पद्माकरास पत्रें

विद्यार्थ्यास कर्तव्यतत्पर करणारें पुस्तक किं. २

तीनहीं पुस्तकें घेणारास ट. व्ही. पी. माफ.

मि. पत्ताः—ग्रंथकाराकडे नासिक शहर


---


मुद्रकः--आर. जी. देवकर, सुदर्शन प्रिं. प्रेस नाशिक

प्रकाशकः–ग्रंथकर्ता, रविवार ८१३